CMYK


जिल्ह्यात पक्षप्रवेशांचा स्फोट! >>पान 2

ब्राह्मण आणि पंडितांनी हिंदू समाजाचं नुकसान केलंय >>पान 3

लोणार येथे आज भव्य 'योग महोत्सव' >>पान 4


### सुविचार

**अंदाज पाण्याचा असो किंवा माणसाचा, एकदा का चुकला की बुडणं निश्चित...!**


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 238 ■ मंगळवार, दि. 07 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणावर गौतमी पाटीलनं दिली प्रतिक्रिया.

आतील पान

## पोलंडच्या महिला पर्यटकांनी केली पंचगंगा नदीची आरती

कोल्हापूर : २००९ पासून दररोज सायंकाळी पंचगंगा नदीची नियमित आरती करणाऱ्या पंचगंगा आरती भक्त मंडळाने रविवारी प्रथेप्रमाणे मावळ-तीला सायंकाळी ६ वाजता १५ मिनिटांची भव्य आरती केली. या विशेष आरतीला पोलंडहून पर्यटनासाठी आलेल्या ७ महिला पर्यटकांची हजेरी लाभली. मंडळाने त्यांच्या हस्ते आरतीचा मान देऊन सुखद आदरांजली वाहिली. पंचगंगा आरतीचा हा उपक्रम गेली १७ वर्षे अखंड चालू आहे. पावसाळ्यात महापुर असतानाही पूर थांबलेल्या जागी आरती केली जाते. दर बुधवारी पोहे, संकष्टीला खिचडी वाटपाचीही परंपरा जपण्यात आली आहे. खरंतर कोल्हापुरातील गांधीनगर आणि पोलंडवासीयांचे नाते खास आहे. यातच पर्यटकांनी या पंचगंगा घाटावर आरतीला हजेरी लावत सर्वांनाच आनंद दिला.

## १० रुपयांचे अंडे २५ हजारांना

नवी दिल्ली: लडाखमधील लेह जिल्ह्या-तील लोक इराणच्या लोकांना मदत करण्यासाठी पुढे आले आहेत. युद्धाच्या काळात लेहमध्ये इराणी पीडितांसाठी विविध देणग्या दिल्या जात आ-हेत. याच काळात लेहमध्ये एक अनोखा उपक्रम पाहायला मिळाला. इराणी पीडितांसाठी देणगी गोळा करण्याकरिता एका लिलाव प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. हा लिलाव एका मोकळ्या जागेत आयोजित करण्यात आला होता, जिथे मोठ्या संख्येने लोक जमले होते. या लिलावात एका अंड्यासाठी २५ हजार रुपयांची बोली लावण्यात आली, तर बाजारात त्याच अंड्याची किंमत फक्त १० रुपये होती.

## पार्किंगवरून वाद

दिल्ली: दिल्लीतील उत्तर रोहिणी परिसरात पोलीस आणि नागरिकांमध्ये मोठा वाद निर्माण झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर रोहिणीमध्ये कार पार्किंगवरून दिल्ली पोलिसांच्या एका महिला उपनिरीक्षक आणि एका ज्येष्ठ नागरिकात वाद झाला. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर अशांतता पसरली. या गोंधळानंतर पोलिसांनी त्या वृद्ध व्यक्तीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, पोलिसांना त्या महिला उपनिरीक्षकाकडूनही एक तक्रार मिळाली आहे.




## बालकांच्या कर्करोग उपचारांसाठी
# मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचा पुढाकार

■ मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन आणि
■ टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात सामंजस्य करार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोगाच्या उपचारासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या प्रकल्पाची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री सहायता कक्ष बीपीसीएल फाऊंडेशन आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराद्वारे सर्व संबंधित घटकांमध्ये समन्वय राखला जाईल आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीस गती मिळणार आहे तसेच, प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यक्षेत्र आणि जबाबदाऱ्यांना सर्व संबंधितांनी मान्यता दिली असून, अंतिम सामंजस्य कराराध्ये ठरविण्यात येणाऱ्या अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली आहे.

**लवकर निदान, परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक**

या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलांचे संरक्षण हे राज्याचे कर्तव्य आहे. कर्करोगाविरुद्ध लढण्यासाठी लवकर निदान , परवडणारे उपचार आणि जागरूकता आवश्यक आहे. शासन आणि समाज दोघांनी मिळून हे काम करणे गरजेचे आहे. टाटा मेमोरियल सेंटर यांनी बालक कर्करोग रुग्णांच्या ऑपरेशनच्या खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून खर्चाची मागणी केली होती. यासाठी विविध संस्थांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला आहे. त्यामध्ये बीपीसीएल फाऊंडेशने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आपला सहभाग नोंदवला आहे. त्यानुसार बीपीसीएल फाऊंडेशन टाटा मेमोरियल सेंटरमध्ये कर्करोगाचे उपचार घेणाऱ्या बालक रुग्णांच्या सहाय्यासाठी योगदान देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.




**या करारामुळे बालकांच्या कर्करोग उपचारांतील आर्थिक अडथळे कमी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सामाजिक दायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत बीपीसीएल फाऊंडेशन यांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी बीपीसीएल फाऊंडेशनकडून विशेष निधी सामाजिक दायित्वमध्ये देणार आहे. अशा या सामंजस्य करारामुळे बालकांच्या कर्करोग उपचारांतील आर्थिक अडथळे कमी होतात. गुणवत्तापूर्ण उपचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत असतात. महाराष्ट्रात आरोग्यसेवांचा दर्जा उंचावत आहे. कर्करोगाशी झुंज देणाऱ्या बालकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी या करारामुळे मोठी मदत होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुले हे देशाचे भविष्य आहेत, त्यामुळे त्यांना कर्करोगासारख्या आजाराशी लढण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. या हेतूने प्रेरित होउन मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून जेवढी मदत करणे शक्य आहे तेवढी मदत करण्यात येत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

सामंजस्य करार घडवून आणण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी महत्वाचे योगदान दिले असून मुख्यतः गरीब व गरजू नागरिकांना, विशेषतः रुग्णांना, तातडीची आर्थिक मदत मिळवून देणे आणि संपूर्ण प्रणाली कार्यक्षम बनवणे हे मुख्य उद्दिष्ट असल्याची माहिती कक्षामार्फत देण्यात आली आहे.

## भाजप स्थापना दिनाच्या पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि योगींनी दिल्या शुभेच्छा

**मुंबई। प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाच्या ४७व्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र म ोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या समर्पणभावना आणि राष्ट्रसेवेच्या कार्याचा गौरव केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटले की, भाजपाने नेहमीच 'इंडिया फर्स्ट' या तत्त्वावर काम करत समाजसेवेत अग्रणी भूमिका बजावली आहे. त्यांनी कार्यकर्त्यांच्या नि:स्वार्थ सेवाभाव, अथक परिश्रम आणि सुशासनासाठीच्या बांधिलकीचे कौतुक केले. अनेक दशकांपासून असंख्य कार्यकर्त्यांच्या त्याग, सेवा आणि दृढ संकल्पामुळे पक्ष अधिक मजबूत झाला असल्याचेही त्यांनी नमूद केले. जनकल्याणाला केंद्रस्थानी ठेवून काम करण्याची पक्षाची परंपरा आजही कायम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही 'नेशन फर्स्ट, पार्टी नेक्स्ट, सेल्फ लास्ट' या मंत्राचा पुनरुच्चार करत कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. सीमा व अंतर्गत सुरक्षा मजबूत करणे, विकासाचे नवे मानदंड निर्माण करणे आणि भारतीय संस्कृतीचे जतन करणे या क्षेत्रांत भाजपाने उल्लेखनीय कार्य केले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ऋषी दधीची यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन राष्ट्रहित सर्वोच्च मानण्याचा संदेश त्यांनी दिला.

स्थापना दिनानिमित्त राष्ट्रसेवेसाठी कार्य करणाऱ्या म हान आत्म्यांना त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी भाजप हा केवळ राजकीय पक्ष नसून एक सजीव वैचारिक परंपरा असल्याचे सांगितले. 'अंत्योदय ते राष्ट्रोदय' या ध्येयाने प्रेरित होऊन पक्षाची वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. ''भाजपाचे राष्ट्रवादी कुटुंब आज एका विशाल वटवृक्षाप्रमाणे उभे आहे, जे सेवा, मूल्ये आणि समर्पणाच्या बळावर देशवासियांच्या आकांक्षांना बळ देत आहे,'' असे ते म्हणाले.

भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## गुप्तचर अधिकारी ठार

तेहरान । वृत्तसंस्था : अमेरिका -इस्रायल विरुद्धच्या युद्धात इराणला मोठा धक्का बसला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या हवाई हल्ल्यात इस्लामिक रिव्होल्युशरी गार्ड्स कॉर्प्सच्या ( आयआरजीसी ) गुप्तचर विभागाचे प्रमुख सय्यद माजिद खादेमी मारले गेले आहेत. आयआरजीसीचे इंटेलिजन्स चीफ मेजर जनरल सय्यद माजिद खादेमी यांचा मृत्यू झाल्याच्या माहितीला इराणनं दुजोरा दिला आहे. सोमवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या हल्ल्यात खादेमी यांचा मृत्यू झाला. खादेमी यांचा मृत्यू नेमका कुठे झाला, ते मात्र इराणनं सांगितलेलं नाही.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भरला उमेदवारी अर्ज

**दैनिक आपला विदर्भ**

**बारामती । प्रतिनिधी :** बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आज म्हणजेच सोमवार ६ एप्रिल रोजी आ-पला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित सभेत सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

काय म्हणाल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ?

यावेळी अजितदादांच्या आठवणीने त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले त्या भावूक होत म्हणाल्या की, २ महिन्यांपूर्वी आम्ही लाडक्या नेत्याला गमावले. बारामती पोटनिवडणुकीचा अर्ज मी दाखल करत आहे. मला स्वप्नातही वाटलं नव्हतं की दादा आज नाहीत हे मला आजही मान्य नाही, पण नियतीने हा काळ आणला आहे. बारामतीकरांची सेवा करणे म्हणजे दादांच्या विश्र्वासाचा आध-ार होता. बारामती हा दादांचा श्र्वास होता, त्यामुळे त्यांचा अखेरचा श्वासही बारामतीच्या मातीत राहिला.



त्यांनी सांगितले की बारामतीतील प्रत्येक झाड, पान, फुल, रस्ते, शाळा, नदी आणि इमारतींमध्ये अजित पवारांचा स्पर्श आहे. सदस्यतेसाठी अर्ज दाखल करताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, तुमचं प्रेम, पाठिंबा आणि साथ हीच माझी शक्ती आहे. गेल्या ३५-३६ वर्षांत अजितदादांना बारामतीकरांनी प्रचंड मताधिक्याने निवडून दिलं. आजची निवडणूक दादांना श्रद्धांजली अर्पण करण्याची संधी आहे. बारामती पोटनिवडणूक राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण ठरत असून, सर्व पक्ष आणि मतदार या निवडणुकीकडे लक्ष ठेवून आहेत. सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात अजित पवार यांच्या बारामतीशी असलेल्या घट्ट नात्यावर बद्दल सांगितले, त्या म्हणाल्या की, प्रत्येक बारामतीकर हा दादांसाठी पांडुरंग होता आणि दादांसाठी बारामती श्वास होती. म्हणून त्यांचा अखेरचा श्वासदेखील बारामतीच्या मातीत विस-ावला, असे सांगतनाच सुनित्रा पवार यांना गहिवरुन आले. दादाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि बारामतीचा विकास करण्यासाछी मी माझे दुःख तळघरात कोंडून अत्यंत धीराने आपल्या सर्वांसाठी बाहेर पडले हा धीर बारामतीकरांकडे बघूनच आला आहे. तुमची साथ ही माझी शक्ती आहे.

# अखेर भोंदू अशोक खरातवर मनी लाँड्रिंगचा गुन्हा

➤ **खरातच्या आर्थिक साम्राज्याच्या मुळाशी जाणार**


➤ **महत्त्वाचे दस्तऐवज घेतले ताब्यात**

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक । प्रतिनिधी :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी भोंदू अशोक खरात विरोधात आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला. यामुळे खरातवर दाखल असणाऱ्या गुन्ह्यांची संख्या १३ वर पोहोचली आहे. या गुन्ह्यामुळे भोंदू खरातचा पाय आणखी खोलात गेला आहे.

भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी त्याच्याविरोधात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल झालेत. यापैकी ८ गुन्हे हे महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक व जादूटोणा केल्याशी संबंधित आहेत. तर इतर ४ गुन्हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. त्यात आता ईडीने दाखल केलेल्या मनी लाँड्रिंगच्या गुन्ह्याची भर पडली आहे. ईडीने प्रस्तुत प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी नाशिक पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर हा गुन्हा () दाखल केला आहे. त्यानुसार, पोलिसांनी जमा केलेली सर्व महत्त्वाचे दस्तऐवज ईडीने आपल्या ताब्यात घेतले आहेत. अशोक खरातचे आर्थिक साम्राज्य नेमके कसे उभे राहिले? याचा तपास आता ईडी करत आहे.

ईडीने गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणाचा प्राथमिक तपास सुरू केल्याचीही माहिती आहे. या प्रकरणी अशोक खरातच्या बेहिशोबी मालमत्तांसह त्याच्या बँक खात्यांची माहिती घेतली जात आहे. या तपासानंतर खरातच्या मालमत्तांवर टाच येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



अशोक खरात व त्याची पत्नी कल्पना खरात यांच्यासह ५ जणांविरोधात शिर्डीत बेकायदा सावकारकी व जमीन व्यवहारात गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे अशोक खरातच्या आर्थिक व्यवहारासह मालमत्ता खरेदी - विक्रीचे व्यवहारही तपास यंत्रणांच्या रडारवर आल्या आहेत. या प्रकरणी विशेष तपास पथकाने शिर्डी नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व माजी नगरसेवकांना चौकशीसाठी समन्स >>पान २

## धाडमध्ये हृदयद्रावक घटना
# अन्नातून विषबाधेचा संशय; तिघा चिमुकल्यांचा मृत्यू

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील धाड येथे घडलेल्या अतिशय दुर्दैवी घटनेने परिसर हादरला असून, एकाच कुटुंबातील तिघा चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. अन्नातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मोहंमद अली मोहंमद वसीम जमदार (वय ४), मशिरा मोहंमद वसीम जमदार (वय ७) आणि फातिमा मोहंमद वसीम जमदार (वय ८) या तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत आई अफरीन मोहंमद वसीम जमदार (वय ३४) आणि अश्मिरा वसीम जमदार (वय ३) यांच्यावर सध्या उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक पण नियंत्रणात असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

रविवारीपासून संबंधित कुटुंबातील सदस्यांना पोटदुखी, मळमळ व उलट्यांचा त्रास सुरू झाला होता. सोमवारी सकाळी प्रकृती अधिक खालावल्याने सर्वांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच अली आणि मशिरा यांचा मृत्यू झाला. सायंकाळी फातिमा हिचाही मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा तीनवर पोहोचला. दरम्यान, आई अफरीन यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, अश्मिराची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेनंतर संपूर्ण धाड परिसरात शोककळा पसरली आहे.

प्राथमिक तपासात अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे. नेमकी विषबाधा कशामुळे झाली, याचा शोध घेण्यासाठी अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे.

CMYK

## आजचा भारत शस्त्रसज्ज आहे

भारताच्या संरक्षण क्षेत्राने २०२५-२६ मध्ये ३८ हजार कोटी रुपयांचा विक्रमी निर्यात टप्पा गाठत, ६२ टक्क्यांची झेप घेतली. आखाती युद्धाच्या अस्थिर पार्श्वभूमीवरही भारताने फक्त निर्यातीतच नव्हे, तर युद्धसज्जतेतही ठाम संदेश देत सामरिक स्वावलंबनाची दिशा दृढ केली आहे. भारताची संरक्षण धोरणे, उत्पादन क्षमता आणि जागतिक प्रतिमा या तिन्हींच्या संगमातून निर्माण झालेली एक नवी वास्तवता आज जगासमोर उभी आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताच्या संरक्षण निर्यातीने तब्बल ३८ हजार कोटी रुपयांचा विक्रम नोंदवला, ही आकडेवारी भारताच्या बदलत्या सामरिक विचारांची साक्ष देणारीच म्हणावी लागेल. विशेष म्हणजे, ही वाढ ६२ टक्क्यांची आहे. म्हणजेच, भारताची प्रगती ही अफाट वेगाने झेप घेणारी प्रगती आहे. या यशामागे 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' या उपक्रमांचा ठोस प्रभाव स्पष्ट दिसतो. एकेकाळी शस्त्रास्त्रांसाठी परदेशावर अवलंबून असलेला भारत आज जगाला शस्त्रास्त्रे पुरवणारा देश बनत आहे. हा बदल सहजासहजी घडलेला नाही; त्यामागे केंद्र सरकारचे धोरणात्मक सातत्य, उद्योग साखळीची केलेली मजबूत उभारणी, खासगी क्षेत्राचा सहभाग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजकीय इच्छाशक्ती याबाबी कारणीभूत आहेत. संरक्षण क्षेत्रातील निर्यातवाढीचे सर्वात मोठे कारण म्हणजे, भारताने केलेला आत्मनिर्भरतेचा स्वीकार. गेल्या दशकात भारताने आयात कमी करण्यावर भर दिला असे नाही; तर स्वदेशी उत्पादनाला मुख्यत्वाने चालना दिली. 'डिफेन्स इंडस्ट्रियल कॉरिडोर', स्टार्टअप इनोव्हेशन, 'आयडीईस' यांसारख्या उपक्रमांनी नव्या तंत्रज्ञानाला चालना दिली. यामुळे भारतीय उद्योगांनी अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, ड्रोन प्रणाली, तोफखाना, रडार यंत्रणा आणि नौदल साधनसामग्री तयार करण्याची क्षमता विकसित केली. भारत आता 'सिस्टम इंटिग्रेटर' म्हणून उभा राहत आहे. म्हणजेच, भारताकडे आज संपूर्ण युद्धसज्ज प्रणाली तयार करण्याची क्षमता आहे आणि ही नक्कीच गौरवास्पद बाब आहे. भारतीय शस्त्रास्त्रांवरील जागतिक विश्वास वाढण्यामागे अलीकडील ऑपरेशन्सचा मोठा वाटा आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतीय सैन्याने दाखवलेली कार्यक्षमता, तांत्रिक कौशल्य आणि अचूकता यामुळे अनेक देशांचे लक्ष भारताकडे वळले. युद्धभूमीवर सिद्ध झालेल्या तंत्रज्ञानाला जागतिक बाजारात अधिक विश्वासार्हता मिळते, हे वास्तव. भारताने सिद्ध केले आहे की, त्याची शस्त्रास्त्रे केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष रणांगणावरही प्रभावी आहेत. त्यामुळेच अनेक आशियाई, आफ्रिकन आणि लॅटिन अमेरिकन देश भारताकडे संरक्षण भागीदारीसाठी वळत आहेत. भारताच्या निर्यातीत सर्वाधिक चर्चेत असलेले उत्पादन म्हणजे 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र. इंडोनेशियासारख्या देशांनी त्यामध्ये रस दाखवणे, हा भारतासाठी व्यावसायिक लाभ नाही; तर तो सामरिक प्रभावाचा विस्तार ठरला आहे. दक्षिण चीन समुद्रात भारतीय अस्त्रांची उपस्थिती म्हणजे भारताच्या भू-राजकीय महत्त्वात झालेली वाढ, असे म्हणता येते. ही फक्त निर्यात नाही, तर एक प्रकारची 'सॉफ्ट पॉवर' आहे. ज्या देशांकडे भारताची शस्त्रास्त्रे असतील, ते देश भारताशी दीर्घकालीन सामरिक नातेसंबंध ठेवतील. त्यामुळे भारताचे संरक्षण धोरण हे आता व्यापार आणि कूटनीती असे समीकरण बनले आहे. याच काळात चिनी शस्त्रास्त्रांच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. पाकिस्तानमध्ये वापरले गेलेले चिनी ड्रोन अपेक्षित कामगिरी करू शकले नाहीत, तर सध्याच्या इराणसंबंधित संघर्षातही चिनी तंत्रज्ञानाच्या मर्यादा समोर आल्या आहेत. यामुळे अनेक देशांनी कमी किंमत या निकषावर आधारित खरेदी करण्याऐवजी विश्वासार्हतेला प्राधान्य दिले आहे. भारताने याच संधीचा नेमकेपणाने फायदा घेतला आहे. भारतीय शस्त्रास्त्रे किंमत, गुणवत्ता आणि विश्वासार्हता या तिन्ही बाबतीत संतुलित असल्यामुळे त्यांची मागणी वाढत आहे. भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आजच्या यशाकडे पाहताना १९६२चे चीन-भारत युद्ध आठवणे हे अपरिहार्य असेच. त्यावेळी भारताकडे आधुनिक शस्त्रास्त्रांचा अभाव होता. धोरणात्मक दुर्लक्ष, सैन्य आधुनिकीकरणातील विलंब आणि राजकीय अकार्यक्षमता यामुळे भारताला नामुष्कीजनक पराभव पत्करावा लागला. त्या काळात संरक्षण क्षेत्राकडे गंभीरतेने पाहिले गेले नाही. उलट, 'बोफोर्स'सारख्या घोटाळ्यांनी या क्षेत्राची प्रतिमा मलिन केली. परिणामी, सैन्याची क्षमता आणि मनोबल दोन्ही बाधित झाले. मात्र, गेल्या दशकात या परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला. आधुनिक शस्त्रास्त्रे, तंत्रज्ञान, सायबर क्षमता, अवकाशाधारित प्रणाली, सीमावर्ती भागात पायाभूत सोयीसुविधांची वेगवान उभारणी आणि संयुक्त लष्करी नियोजन या सर्व बाबींमध्ये भारताने मोठी झेप घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संरक्षण क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या. 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' या पदाची केली गेलेली निर्मिती, तीनही सैन्यदलांमधील समन्वय वाढवणे, 'थिएटर कमांड' संकल्पना आणि स्वदेशी उत्पादनावर भर या सर्व उपाययोजनांनी भारतीय सैन्य अधिक सक्षम बनले आहे. याशिवाय, खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवून स्पर्धात्मकता निर्माण करण्यात आली. यामुळे नव्या कल्पना, तंत्रज्ञान आणि कार्यक्षमतेला चालना मिळाली. संरक्षण क्षेत्र हे सरकारी नियंत्रणाखाली राहिलेले नाही, तर ते एक गतिमान औद्योगिक क्षेत्र बनले आहे. संरक्षण निर्यात वाढली असली, तरी भारताने आपल्या युद्धसज्जतेकडे अजिबात दुर्लक्ष केलेले नाही. सध्याच्या आखाती युद्धस्थितीत भारताने आपली सैन्यतयारी अधिक बळकट केली आहे. याच पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल पाकिस्तानला दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा. 'ऑपरेशन सिंदूर' संपलेले नाही, असा स्पष्ट संदेश देत त्यांनी भारताच्या निर्धाराची जाणीव करून दिली. हा इशारा केवळ राजकीय वक्तव्य नाही; तर तो भारताच्या बदललेल्या धोरणाचा भाग आहे. आता भारत प्रतिक्रिया देणारा देश राहिलेला नाही, तर तो प्रतिसाद ठरवणारा देश बनला आहे. भारत हा शांततेचा समर्थक आहे; पण आपल्या सुरक्षेसाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यामुळेच आजचा भारत शस्त्रसज्ज आहे, निर्यातीतही आणि निर्धारातही!

# जिल्ह्यात पक्षप्रवेशांचा स्फोट!

## मातोश्रीवर शेकडोंचा 'ठाकरे' गटात प्रवेश

### लोणार-मेहकर तालुक्यातील दिग्गज नेते, सरपंच व शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश; राजकीय वर्तुळात खळबळ







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या पक्षप्रवेशांच्या धुमाकुळात आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षानेही जोरदार मुसंडी मारली आहे. लोणार आणि मेहकर तालुक्यातील अनेक दिग्गज नेते, सरपंच व शेकडो कार्यकर्त्यांचा थेट मुंबईतील 'मातोश्री' येथे पक्षप्रवेश पार पडला. हा प्रवेश पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झाला.

एका बाजूला जिल्हाभर विविध पक्षांत प्रवेश सुरू असताना, ठाकरे गटाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनीही पुढाकार घेत पक्षबांधणीवर भर दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांना पक्षात दाखल करण्यात आले. काँग्रेस व भाजपमधील अनेक दिग्गजांसह सामान्य नागरिकांनीही या प्रवेशात सहभाग घेतल्याने जिल्ह्यात राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

विशेष म्हणजे, बहुजन वंचित आघाडीचे पदाधिकारी, सहा विद्यमान सरपंच, आठ माजी सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने ठाकरे गटात दाखल झाले आहेत. यामुळे आगामी राजकारणात समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.

या वेळी खासदार अरविंद सावंत, विनायक राऊत, संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हाध्यक्ष जालिंदर बुधवंत, प्रा. आशिष रहाटे, राजू बुधवंत, जीवन घायाळ, रवी ओव्हर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

राजकीय विश्लेषण:

या मोठ्या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणे ढवळून निघण्याची शक्यता असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाची ताकद वाढल्याचे चित्र स्पष्ट होत आहे

पान १ वरून...

## अखेर भोंदू अशोक खरातवर मनी लॉंड्रिंगचा गुन्हा

बजावला आहे. साई संस्थानचा एक माजी विश्वस्तही यासंबंधी चौकशीच्या रडारवर आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, शिर्डीत भोंदू खरातचा मोठा भक्त परिवार होता. त्यामुळे त्याचे सर्वाधिक आर्थिक व्यवहार व मालमत्ता खरेदी - विक्रीचे व्यवहार तेथूनच चालायचे. तो आपल्या अनेक भक्तांच्या मालमत्ता खरेदी - विक्रीत भागीदार असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्यानंतर लगेचच ईडीचा गुन्हा

उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी नाशिकच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी अशोक खरात प्रकरणाची ईडी मार्फत चौकशी करण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ईडीने या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. मुख्यमंत्री यासंबंधी म्हणाले होते, अशोक खरात प्रकरणात एसआयटी सखोल चौकशी करत आहे. हा तपास रोजच्या रोज जाहीर करता येणार नाही. पण खरातची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. त्याच्या सर्व व्यवहारांची चौकशी होईल. ईडीनेही या प्रकरणाची माहिती घेतली आहे. त्यामुळे त्याची ईडी चौकशीही होईल.

## अखेर भोंदू अशोक खरातवर मनी

४५ दिवसांचा युद्धविराम होणार? अमेरिका - इराण एकमेकांच्या अटी मान्य करणार?

नवी दिल्ली ६ एप्रिल (पीएसआय)

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आता युद्धविराम (सीजफायर) होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धविरामाचा एक आराखडा तयार झाला आहे. हा आराखडा लवकरच लागू होऊ शकतो, ज्यामुळे इराण होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा जहाज वाहतुकीसाठी खुली करू शकतो.

सूत्रांनी सांगितले की, इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव कमी करण्यासाठीचा फ्रेमवर्क पाकिस्तानने तयार केला असून तो दोन्ही देशांना रातोरात पाठवण्यात आला आहे. या प्रस्तावात तात्काळ युद्धविरामानंतर सर्वसमावेशक करारासाठी दोन-स्तरीय (टू-लेयर) धोरणाची रूपरेषा देण्यात आली आहे.

एका सूत्राने सांगितले, ''आज सर्व मुद्द्यांवर सहमती होणे अपेक्षित आहे. प्रारंभिक समज पाकिस्तानमार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अंतिम करण्यात आली असून आता त्याला सामंजस्य करार (एमओयू)चे स्वरूप दिले जाणार आहे.'' या संपूर्ण चर्चाप्रक्रियेत पाकिस्तान एकमेव ''संवाद माध्यम'' (कम्युनिकेशन चॅनेल) म्हणून काम करत आहे.

याआधी रविवारी एका न्यूजने अहवाल दिला होता की, संभाव्य ४५ दिवसांच्या युद्धविरामाबाबत अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा सुरू आहे, ज्यामुळे युद्ध कायमचे थांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर, अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी वॅन्स, विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची यांच्याशी रात्रभर संपर्कात होते. हा करार झाल्यास तो दोन टप्प्यांत राबवला जाईल. पहिल्या टप्प्यात ४५ दिवसांचा युद्धविराम (सीजफायर) असेल, ज्यादरम्यान युद्धाचा

# राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा

## एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शासनाची व्यापक उपाययोजना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या २५.३६ लाखांवर पोहोचली असून एका महिन्यात ७३ हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. सीजीडी पाईपलाईनसाठी ' ' देण्याचा निर्णय घेतल्याने नेटवर्क विस्ताराला गती मिळणार आहे. ज्या ठिकाणी पीएनजी नेटवर्क पोहोचलेले आहे त्याठिकाणी ग्राहकांनी त्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणी एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार असून महाराष्ट्रात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी ही माहिती दिली. यावेळी शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, 'पीआयबी'च्या महासंचालक स्मिता वत्स-शर्मा, तेल उत्पादक राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, कृषी संचालक सुनिल बोरकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

मध्यपूर्वेतील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठा साखळीवर काही प्रमाणात दबाव निर्माण झाला असला, तरी राज्यातील पुरवठा सुरळीत असल्याचे सांगून अपर मुख्य सचिव डिग्गीकर म्हणाले की, जिथे जिथे शक्य आहे तिथे पीएनजीचा वापर वाढवण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाईप लाईन गॅस पुरवठा शक्य आहे. त्या ठिकाणी ३० जून पर्यंत पीएनजी बंधनकारक असून ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणा एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार आहे. पीएनजी कनेक्शन ज्या भागांमध्ये उपलब्ध तिथे त्याचा वापर वाढवायचा असून ग्राहकांच्या दृष्टीने विचार करता पीएनजी स्वस्त असून त्याचे देशांतर्गत उत्पादन जास्त आहे. पीएनजी नेटवर्क जिथे पोहोचले आहे तिथे तिथे ग्राहकांनी नोंदणी केली पाहिजे असे अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी यावेळी सांगितले.

राज्यात सुमारे २४ तेल डेपोमार्फत ८,१०० पेट्रोल पंपांना सेवा पुरवली जात असून दररोज सुमारे १८,५०० केएल पेट्रोल आणि ४०,००० केएल डिझेलचे वितरण केले जात आहे. १ ते ४ एप्रिलदरम्यानची विक्रीही मागील महिन्यांच्या सरासरीशी सुसंगत असल्याने इंधनटंचाईची स्थिती नाही.

शिधा नियंत्रक श्री.डांगे यांनी सांगितले की, राज्यातील २३ बॉटलिंग प्लांट्समार्फत सुमारे २,२०० वितरक आणि ३.५ कोटी ग्राहकांना सेवा दिली जाते. घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून दररोज सरासरी ५.८२ लाख रिफिल वितरित केले जात आहेत. वितरण पारदर्शक करण्यासाठी डीएसी सक्तीचा करण्यात आला आहे.

ग्राहकांना डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारेच बुकिंग करण्याचे आवाहन करण्यात आले असून सध्या ९५ टक्के बुकिंग ऑनलाईन होत आहेत. न्याय्य वितरणासाठी बुकिंग अंतराल निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

व्यावसायिक एलपीजीचे वाटप टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आले आहे. अत्यावश्यक सेवा क्षेत्रांना १०० टक्के पुरवठा, तर संरक्षण, रेल्वे, पोलीस यांसारख्या विभागांना ७० टक्के पुरवठा राखण्यात आला आहे. उद्योग आणि इतर क्षेत्रांना २० टक्के ते ५० टक्के पर्यंत पुरवठा दिला जात आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार हॉटेल, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग आदी क्षेत्रांना प्राधान्याने अतिरिक्त २० टक्के वाटप करण्यात आले आहे.

घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यभर दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. १ मार्च ते ६ एप्रिल दरम्यान १४,३२९ तपासण्या/छापे अंतर्गत ३,६२८ सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत.

कारवाईदरम्यान २१ वाहतूक वाहने जप्त करण्यात आली असून २ गॅस कॅप्सूल/टँकर्सही ताब्यात घेण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या एलपीजी गॅसचे एकूण प्रमाण ७१,५६५.१४ किलो इतके आहे. या प्रकरणांमध्ये ५३ गुन्हे () नोंदविण्यात आले असून ३६ जणांना अटक करण्यात आली आहे. या संपूर्ण कारवाईत जप्त करण्यात आलेल्या गॅस व वाहनांची एकूण अंदाजे किंमत २ कोटी ३८ लाख ५४ हजार ४९३ रुपये इतकी आहे.

राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. एलपीजी पुरवठ्यासंदर्भात तक्रारींसाठी ९७६९९१९२२१ हा व्हॉट्सॲप क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. १७ मार्च ते ६ एप्रिलदरम्यान २,४०९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

इंधन पुरवठ्यावर देखरेख ठेवण्यासाठी राज्यस्तरीय समिती




कार्यरत असून ८ मार्चपासून दररोज आढावा बैठक घेतली जात आहे. जिल्हा प्रशासन आणि तेल कंपन्यांना दररोज दुपारी १ वाजेपर्यंत साठा अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. एलपीजी वाहतूक आणि वितरण सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस संरक्षण देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सोशल मीडियावरील अफवांवर कारवाई करण्यात येणार असून माध्यमांद्वारे नियमित माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच केंद्र सरकारकडून मिळालेल्या ३७४४ किलोलिटर केरोसीनचे जिल्हानिहाय वाटप करण्यात आले असून प्रति कुटुंब ३ लिटर वितरणाचे निर्देश आहेत. तसेच ''नैसर्गिक वायू व पेट्रोलियम पदार्थ वितरण आदेश, २०२६'' राज्यात लागू करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पेट्रोलियम पुरवठ्याशी संबंधित परिस्थिती हाताळण्यासाठी नियंत्रक शिधावाटप तथा संचालक नागरी पुरवठा चंद्रकांत डांगे यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शासनाने बहुआयामी उपाययोजना राबवल्या असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम राखावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कृषी संचालक सुनिल बोरकर यांनी सांगितले की, राज्यात खरीप हंगाम २०२६ साठी एकूण ४८.८० लाख मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले असून सध्या सुमारे ५२ टक्के साठा उपलब्ध आहे. एप्रिल-मे महिन्यात कमी मागणीमुळे साठ्यात आणखी वाढ होणार असून हंगामाच्या सुरुवातीलाच ५५६० टक्के खत उपलब्ध राहण्याचा अंदाज आहे. खतांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर नियोजन करण्यात आले आहे. तसेच तुटवडा टाळण्यासाठी युरिया व डीएपीचा संरक्षित साठा ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

काळाबाजार, साठेबाजी आणि बोगस विक्री रोखण्यासाठी कडक कारवाई सुरू असून शेतकऱ्यांना पर्यायी खतांच्या वापराचेही आवाहन बोरकर यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### सेन्सेक्स-निफ्टीमध्ये घसरण

नवी दिल्ली : आज सुरुवातीच्या व्यवहारात चढ-उतारामुळे देशांतर्गत शेअर बाजार दबावाखाली राहिला. व्यवहारांची सुरुवात जोरदार झाली. तथापि, बाजार उघडताच खरेदीदार आणि विक्रेते एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करू लागले, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांच्या हालचालींमध्ये चढ-उतार दिसून आले. सकाळी १०:०० वाजेपर्यंत, सेन्सेक्स ०.१७ टक्क्यांनी आणि निफ्टी ०.६५ टक्क्यांनी घसरला होता. शेअर बाजारातील दिग्गज कंपन्यांमध्ये, ट्रेंट लिमिटेड, विप्रो, हिंडाल्को इंडस्ट्रीज, कोल इंडिया आणि टेक महिंद्रा यांचे शेअर्स ४.०६ टक्क्यांपासून ते १.४५ टक्क्यांपर्यंतच्या वाढीसह व्यवहार करत होते. दुसरीकडे, कोटक महिंद्रा, रिलायन्स इंडस्ट्रीज, मॅक्स हेल्थकेअर, इंटरग्लोब एव्हिएशन आणि सन फार्मास्युटिकल्सचे शेअर्स १.४२ टक्के ते १.२३ टक्क्यांच्या वाढीसह व्यवहार करत होते.

### २ प्लॅटफॉर्मवरून लोकल

विरार : पश्चिम रेल्वेच्या विरार रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म विस्तारीकरणाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. यामुळे आता या स्थानकावर १५ डब्यांच्या लोकल ट्रेन सहजपणे थांबू शकतील. प्लॅटफॉर्म क्रमांक ३ आणि ४ ची रुंदी ४ मीटरने वाढवण्यात आली असून, हे काम 'मुंबई रेल्वे विकास महामंडळाने' (चठतउ) अवघ्या ४ महिन्यांच्या विक्रमी वेळेत पूर्ण केले आहे. यासोबतच, स्थानकाच्या पश्चिम भागात नवीन 'होम प्लॅटफॉर्म क्रमांक ८' देखील तयार करण्यात आला आहे. यामुळे विरार स्थानकावरून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या लोकल गाड्यांचे संचलन अधिक सुलभ आणि शिस्तबद्ध होणार आहे. लवकरच या नवीन प्लॅटफॉर्मवरून १५ डब्यांच्या लोकल सेवा सुरू केल्या जातील. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, तयार झालेले सर्व प्लॅटफॉर्म लवकरच पश्चिम रेल्वेच्या प्रशासनाकडे सोपवण्यात येतील.

### बारामती निवडणुकीवरुन पार्थ पवारांचा थेट इशारा

**पुणे । प्रतिनिधी :** राज्यातील दोन मतदारसंघात विधानसभेसाठी पोटनिवडणूक होत असून बारामती विधानसभा निवडणूक बिनविरोध करण्यासाठी महायुतीकडून प्रयत्न करण्यात आले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या येथील जागेवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर, महाविकास आघाडीकडून काँग्रेसने आकाश मोरे यांना मैदानात उतरवलं आहे. काँग्रेसने धनगर समाजाचा चेहरा बारामतीच्या निवडणूक रिंगणात उतवला असून सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्यास, निवडणूक बिनविरोध करण्यास असमर्थता दर्शवली. त्यामुळे, महायुतीच्या नेत्यांकडून काँग्रेसच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली जात आहे. तर, पार्थ पवार यांनी चक्क काँग्रेसला इशाराच दिला आहे.

माझं कुणाशी बोलणं झालं नाही. काँग्रेसला (त्यांना) कळायला पाहिजे काय करायचं ते. त्यांच्या (काँग्रेसच्या) राष्ट्रीय नेतृत्वाबाबत मला नाही माहिती. सगळे मोठे लोक आहेत, सर्वांना माहिती आहे काय चाललंय. त्यांनी (काँग्रेसने) विचार केला असेल तर करु द्या. पण त्यांना (काँग्रेसला) नंतर काय त्रास होईल महाराष्ट्रात, हे त्यांना दिसेल, अशा शब्दात पार्थ पवार यांनी काँग्रेसच्या उमेदवारीबाबत थेट इशाराच दिलाय.

### अजित पवारांच्या अपघाताच्या दिवशी अशोक खरातच्या मोबाईलवर धडाधड मेसेज, अंजली दमानियांचा खळबळजनक दावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामतीत विमान अपघातामध्ये मृत्यू झाला त्यादिवशी अशोक खरातच्या मोबाईलवर काही मेसेज आले होते, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. अंजली दमानिया यांनी अलीकडेच अशोक खरातच्या मोबाईल फोनचा सीडीआर डेटा समोर आणला होता. यानंतर मोठी खळबळ माजली होती. अंजली दमानियांकडे खरातच्या मोबाईलचा सीडीआर डेटा कुठून आला, याविषयी प्रश्न उपस्थित झाले होते. त्याला अंजली दमानिया यांनी सोमवारी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत उत्तर दिले. एका व्यक्तीने आपल्या खरातचा सीडीआर डेटा दिल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अंजली दमानिया यांनी नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्याविषयी एक सनसनाटी दावा केला. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या दिवशी अशोक खरातच्या मोबाईलवर काही मेसेज आले होते. समता पतसंस्थेकडून खरातला अजित पवारांच्या अपघाताच्या दिवशी आणि नंतर सतत मेसेज पाठवले जात होते. समता पतसंस्था आणि अशोक खरात याचा काय संबंध आहे?, असा सवाल अंजली दमानिया यांनी उपस्थित केला. अजित पवारांच्या अपघाताशी समता पतसंस्थेचा संबंध असण्याची दाट शक्यता आहे. समता पतसंस्थेकडून २७ जानेवारी ते ३१ तारखेपर्यंत अशोक खरात याच्या मोबाईल फोनवर जे मेसेज आले त्याची चौकशी व्हावी, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली.

अंजली दमानिया यांच्या पत्रकार परिषदेनंतर आमदार रोहित पवार यांनी एक ट्विट केले. अजितदादांच्या अपघाताच्या एक दिवस आधी, अपघाताच्या दिवशी आणि अपघाताच्या दुसऱ्या दिवशी 'समता पतसंस्थे'त भोंदू अशोक खरातचे मोठे आर्थिक व्यवहार झाल्याची धक्कादायक माहिती अंजली दमानिया यांनी दिली आहे.

# ब्राह्मण आणि पंडितांनी हिंदू समाजाचं नुकसान केलंय

## नितीन गडकरींच्या आरोपावर नाना पटोलेंनी काढला चिमटा

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** देशातील काही पंडित आणि ब्राह्मणांनी चुकीचं काम केल्यामुळे हिंदू धर्माचे मोठे नुकसान झाल्याचं वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केलंय, ते आज नागपूर येथे आयोजित भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिवसाच्या कार्यक्रमात बोलत होते. अस्पृश्यता, जातीवाद कुठेही नव्हता. मात्र,चुकीच्या पद्धतीने या गोष्टीचा प्रचार प्रसार झाला, ज्यामुळे हिंदू धर्माचे नुकसान झालंय. त्या काळात हिंदू धर्मात कोंबडी खाऊन उरलेला भाग कोणाच्या घरात फेकला तर हिंदू धर्मातून बाहेर काढले जायचे. त्या काळातील काही पंडित आणि ब्राह्मणांच्या चुकीच्या वक्तव्यामुळे हिंदू धर्माचं नुकसान झालंय. प्रत्येक व्यक्ती हा जात-पात धर्म पंथ नाही तर गुणाने मोठा बनला आहे, असंही गडकरींनी अधोरेखित केलंय.

**आमच्या पक्षाला बदनाम केले- गडकरी :** महात्मा गांधीचे हत्यारे, मुस्लिम समाज विरोधी, जातीवादी पक्ष असा आमच्या पक्षाला बदनाम करण्यात आलंय. शोले चित्रपटाची कथा सलीम जावेद यांची होती. जावेद अख्तर यांनी अटल बिहारी वाजपेयी यांची मुलाखत घेतली होती, त्यात अटल बिहारी वाजपेयी यांनी हा देश सेक्युलर आहे आणि सेक्युलर राहील असे वक्तव्य केलं होतं. भारतीयत्व, राष्ट्रीयत्व हेच खरं हिंदुत्व आहे. सेक्युलर शब्दाचा अर्थ हा धर्मनिरपेक्षता नाही तर सर्वधर्मसमभाव असाच आहे. भाजपाची स्थापना पंतप्रधान बनण्यासाठी झाली नव्हती. अटल बिहारी वाजपेयी सांगत होते, देशाचे पंतप्रधान कोण होणार हे महत्त्वाचं नाही तर देश मजबूत कसा होईल हे महत्त्वाचं असल्याचं सांगायचे. त्यानंतर आम्ही अनेक उद्दिष्ट आणि स्वप्न पूर्ण केलंय. आमचा पक्ष सांप्रदायिक, जातीवादी किंवा कोणत्या धर्म विरोधात नसल्याचंही नितीन गडकरींनी सांगितलंय.

**इंदिरा गांधी, राजीव गांधीचे अंत्यसंस्कार ब्राह्मणांनी केले- गडकरी :** व्यक्ती धर्मनिरपेक्ष राहू शकत नाही, जर असं असतं तर इंदिरा गांधी आणि राजीव गांधींच्या निधनानंतर ब्राह्मणांना बोलावून मंत्राग्नी केले गेले नसते. ते सेक्युलर असते तर ब्राह्मणांना कशाला बोलावलं असतं, कारण त्यांच्यासोबत धर्म जोडला गेला होता आणि त्याचा त्यांनी स्वीकार केलेला होता. मुस्लिम बांधव मक्का मदिनाला जातो, तेव्हा हिंदू-मुसलमान भेदभाव करतात का? इंग्रजांच्या काळात आपल्या डोक्यात चुकीच्या गोष्टी बसविण्यात आल्यात. म्हणून गेल्या काही काळात आपल्याबद्दल जो काही अपप्रचार झाला आणि आपली प्रतिमा आपण जातीवादी किंवा मुस्लिम विरोधी असल्याचे रंगवली गेली, खरं तर जे आरोप होत आहेत, ते चुकीचे असल्याचंही नितीन गडकरी यांनी सांगितलंय.

**ए. आर. अंतुले कोकणस्थ ब्राह्मण होते – गडकरी :** सध्या इराण आणि अमेरिकेत युद्ध सुरूच आहे. मी शिपिंग मंत्री असताना चाबहार नावाचा मोठा पोर्ट बनविण्याचा सौभाग्य मला मिळालं. मी सात ते आठ वेळा इराणला गेलो. मी स्पेशल फ्लाईटने जात होतो. एकदा पाकिस्तानने माझ्या फ्लाईटला मध्ये थांबवलं आणि पुढे जाऊ शकत नाही, असं सांगितलं. त्यानंतर मी परत गुजरातमध्ये येऊन गेलो. मी जेव्हा आयातुला खोमोनी यांच्या घरी भेटायला गेलो, तेव्हा त्यांनी मला प्रश्न विचारला की, आमची परशियन भाषा ही कुठून आलीय. मी माहीत नाही म्हटल्यावर, त्यांनी मला सांगितले ही भाषा संस्कृतपासून आली आहे आणि मी लखनऊ येथील असल्याचं खोमोनी सांगितलं. आमची विरासत, इतिहास आणि संस्कृती एकच आहे. ए आर अंतुले आमचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मला सांगितले की, मी कोकणस्त्र ब्राह्मण आहे, माझं नाव करंदीकर असल्याचं सांगितल्याचंही नितीन गडकरी म्हणालेत.

गडकरींनी धर्मनिरपेक्षतेचा चुकीचा अर्थ लावला- नाना पटोले : ब्राह्मण आणि पंडितांनी हिंदू समाजाचे नुकसान केल्याचं वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केल्यानंतर त्यावर काँग्रेस नेते नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिलीय. ते म्हणाले की, गडकरी हे विद्वान आहेत, गडकरी साहेबांबद्दल मला आदर आहे. ज्या धर्मात आम्ही जन्मलोय, त्या धर्माच्या प्रथा परंपरेप्रमाणे आपला जन्म आणि मृत्यू या सगळ्या गोष्टी त्या पद्धतीने होतात. संविधानात धर्म आणि व्यक्ती स्वातंत्र्य दिलेलं आहे, त्याने कुठल्या धर्मात जन्माला यायचा आणि कुठल्या धर्मात मरायचं हा ज्याचा त्याचा अधिकार आहे, त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर हे त्यासाठी सर्वात मोठे उदाहरण आहे. त्यामुळे मला असं वाटतं नितीन गडकरी धर्मनिरपेक्षतेचा चुकीचा अर्थ काढत आहे, प्रत्येकाला आपला धर्म निवडण्याचा आणि जगण्याचा अधिकार संविधानानं दिल्याचंही नाना पटोलेंनी सांगितलं.



**ब्राह्मणी व्यवस्था संपवण्यासाठी पुढाकार घ्यावा– नाना पटोले :** गडकरी यांनी ज्ञानेश्वर माऊली आणि तुकाराम महाराजांबद्दल सांगितलं पाहिजे, जेव्हा त्यांना वैकुंठात पाठवले होते, त्याच ब्राह्मण व्यवस्थेने ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजांना कसा त्रास दिला होता आणि मारलं होतं. व्यवस्था त्यावेळी होती, आजही आहे, संपलेली नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुढाकार घ्यावा आणि संपवावे, असं आवाहनही नाना पटोलेंनी नितीन गडकरींनी केलंय.

# नागपूरकरांवर पाणीसंकट

## सलग २ दिवस या भागात राहणार पाणी पुरवठा बंद

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** नागपूर शहरातील नागरिकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तांत्रिक कामांमुळे शहरात ७ एप्रिल आणि ८ एप्रिल या दोन दिवसांत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असून, अनेक भागांमध्ये अल्प प्रमाणात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

महापालिकेकडून मुख्य जलवाहिनीवर नवीन वॉल्व्ह बसवण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी पेंच जलशुद्धीकरण प्रकल्प तब्बल ३६ तास बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील नऊ झोनमधील मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा खंडित होणार आहे.

**कामाचा कालावधी**

हे काम ७ एप्रिल सकाळी १० वाजल्यापासून सुरू होऊन ते ८ एप्रिल रात्री १० वाजेपर्यंत चालणार आहे. या कालावधीत त्यामुळे नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

**कोणत्या भागात परिणाम?**

या बंदमुळे अनेक प्रमुख भागांवर परिणाम होणार आहे:

खालील भागात राहणार पाणीपुरवठा बंद

लक्ष्मीनगर झोनमध्ये गायत्रीनगर, प्रतापनगर, खटला भागात पाणी बंद

टाकळी सिम, जयताळा, त्रिमूर्तीनगर भागात जलकुंभातून पुरवठा बंद

धरमपेठ झोनमध्येही परिणाम रामनगर, सिव्हिल लाईन, सेमिनरी हिल भागात पाणी बंद

फुटाळा लाईन, रायफल लाईन, टेकडी वाडी भागात पाणी बंद बर्डी आणि धंतोली परिसरातही होईल टंचाई

हनुमान नगर झोनमध्ये चिंचभवन, ओंकारनगर, हुडकेश्वर परिसरातही पाणीपुरवठा बंद

श्रीनगर, नालंदानगर, दुमजली भागातही परिणाम, अनेक जलकुंभ क्षेत्रांमध्ये पाणी बंद

गांधीबाग झोनमध्ये पाणीपुरवठा खंडित सीताबर्डी, किल्ला महाल, मेडिकल परिसर प्रभावित

संतरंजीपुरा झोनमध्येही पाणी बंद बोरियापुरा,रेल्वे परिसर, वाहन ठिकाण प्रभावित

आशीनगर झोनमध्ये नारा , नारी, जरीपटका भाग प्रभावित, नागरिकांनी पाण्याची साठवण करण्याचे आवाहन

मंगळवारी झोनमध्ये गिट्टीखदान, गोरेवाडा प्रभावित राजनगर आणि सदर परिसरातही पाणी बंद

नागरिकांना प्रशासनाचे आवाहन

महापालिकेकडून नागरिकांना आधीच पाण्याची साठवण करून ठेवावी, तसेच पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दोन दिवसांच्या या पाणी बंदीमुळे नागपूरकरांना काही प्रमाणात गैरसोय होणार असली, तरी भविष्यातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हे काम आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## बारामती पोटनिवडणूक; बिनविरोधावर मतभेद, महायुती आणि काँग्रेसमध्ये नेमका संघर्ष कशासाठी?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीतून पोटनिवडणूक लढवण्याचा निर्णय घेत, त्यासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला. पण ही निवडणूक बिनविरोध होईल असं वाटत असताना काँग्रेसने बारामतीमधून आकाश मोरे यांची उमेदवारी जाहीर केली. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीकडून सुरुवातीपासूनच आवाहन केलं गेलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ''सुनेत्रा पवार यांची निवडणूक बिनविरोध व्हावी अशी मी सर्व पक्षांना विनंती करतो. आर.आर.पाटील यांच्या निधनानंतरही सर्व पक्षांनी ही निवडणूक बिनविरोध करून महाराष्ट्राची संस्कृती जपली होती. आताही ती जपावी अशी आमची विनंती आहे'' असं फडणवीस म्हणाले. त्याचबरोबर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अशा परिस्थितीत महाराष्ट्रात पोटनिवडणुका बिनविरोध करण्याची परंपरा राहिली असल्याचं नमूद करत महायुती सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचं स्पष्ट केलं.

जर महाविकास आघाडीबाबत बोलायचं असेल तर त्यासाठी सुनेत्रा पवार यांनी शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत पाठिंब्याची विनंती केली होती. उद्धव ठाकरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असला तरी काँग्रेसकडून मात्र या प्रयत्नांना प्रतिसाद मिळाला नाही.

काँग्रेसकडून भाजपाची कोंडी करण्याचा प्रयत्न? – आज बारामती पोटनिवडणुकीचा अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. सुनेत्रा पवार आणि काँग्रेसचे आकाश मोरे या दोन्ही उमेदवारांकडून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. ९ एप्रिल ही अर्ज मागे घेण्यासाठीची अंतिम तारीख आहे. काँग्रेसकडून हा अर्ज मागे घेतला जाणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असताना काँग्रेस उमेदवार आकाश मोरे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

यावेळी आकाश मोरे यांनी आपण उमेदवारी अर्ज मागे घेण्यास तयार असल्याचं सांगितलं, मात्र त्यासाठी एक अट असल्याचं स्पष्ट केलं. बारामतीत अनेक प्रश्न प्रलंबित असून त्याच मुद्द्यांवर आपण निवडणूक लढवत असल्याचं मोरे यांनी नमूद केलं. अजित पवार यांच्या अपघाताचा मुद्दा उपस्थित करत, त्या घटनेनंतर अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही, अशी टीकाही त्यांनी केली. राज्य सरकारनं या प्रकरणी गुन्हा नोंदवला, तर आपण तत्काळ उमेदवारी मागे घेऊ, असंही मोरे यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे काँग्रेसकडून अजित पवार यांच्या अपघाताबाबत गुन्हा दाखल करण्यासाठी ही दबावाची खेळी आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## बिनविरोध नसला तरी सुनेत्राताईना विक्रमी विजय मिळावा; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बारामतीकरांना आवाहन

**बारामती । प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या जडणघडणीत माजी मुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर महायुतीच्या उमेदवार म्हणून सुनेत्रा पवार या निवडणूक लढवत आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा असली तरी कोणताही कार्यकर्ता गाफील राहता कामा नये. निवडणूक लागलीच तर ती झुंजारपणे लढून सर्व रेकॉर्ड मोडीत काढत विक्रमी विजय मिळवायचा आहे, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. सुनेत्रा पवार यांनी महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला, त्यावेळी ते बोलत होते.

अजितदादांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करताना शिंदे म्हणाले की, ही पोटनिवडणूक आपल्यावर दुर्दैवाने ओढवली आहे. त्यांच्या आकस्मिक दु:खद निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. बारामतीसह संपूर्ण राज्याच्या विकासात त्यांनी भक्कम पायाभरणी केली. अनेक खात्यांची, विशेषत: अर्थ खात्याची जबाबदारी त्यांनी अत्यंत सक्षमपणे पेलली. एक कणखर प्रशासक, धारदार संघटक आणि जनतेचा नेता म्हणून त्यांनी आपली छाप उमटवली.

ते पुढे म्हणाले की, आम्ही अनेक वर्ष खांद्याला खांदा लावून काम केले. मुख्यमंत्री असताना ''माझी लाडकी बहीण'' योजना राबवताना मोठे आर्थिक आव्हान होते. तरीही देवेंद्र फडणवीस, मी आणि अजितदादांनी ठाम निर्णय घेतला. अजितदादांनी आर्थिक ताळमेळ ढळू न देता ही योजना प्रभावीपणे राबवली. त्यांचा स्वभाव स्पष्ट, कणखर आणि तेवढाच आपुलकीचा होता. त्यामुळे त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी प्रचंड आहे.

सुनेत्राताईनी या कठीण काळात जबाबदारी खंबीरपणे उचलली आहे. दु:ख पचवून त्यांनी कामाचा वेग कमी होऊ दिलेला नाही. सांत्वन करणे सोपे असते, पण दु:ख पचवून उभं राहणं कठीण असतं आणि ते त्यांनी करून दाखवलं आहे. पवार कुटुंबावर आलेल्या संकटात आपण सगळे त्यांच्या सोबत ठामपणे उभे आहोत. आज देवेंद्र फडणवीस, मी आणि सुनेत्राताई राज्यकारभार अधिक जबाबदारीने पुढे नेत आहोत. योजना सुरू ठेवतानाच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसारखे धाडसी निर्णय घेतले जात आहेत.या भागात अजितदादांनी उभारलेला विकास हा साक्षात उभा आहे आणि त्याची साक्ष सुनेत्राताई देत आहेत. त्यामुळे बारामतीची जनता त्यांच्या पाठीशी भक्कम उभी आहे. अनेक संघटना आणि नागरिकांनी उघडपणे पाठिंबा जाहीर केला आहे.

# भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणावर गौतमी पाटीलनं दिली प्रतिक्रिया...

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी :** नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरातचे दिवसेंदिवस अनेक काळे कारनामे समोर येत असून महिला लैंगिक शोषण, आर्थिक फसवणुक यांसारखे गुन्हे देखील आता समोर येत आहे. अशातच आता प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील ने भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

अशोक खरातवर योग्य ती कठोर कारवाई झाली पाहीजे. यावर लक्ष द्यायला पाहीजे. आपल्याकडे पुन्हा अशा घटना घडल्याच नाही पाहीजे, असं गौतमी पाटील म्हणाली. तसेच यासाठी कडक कारवाई व्हायला हवी, म्हणजे देशात असे प्रकार कुठे घडणार नाहीत, असंही गौतमीने सांगितले.

अशोक खरातवर आणखी एक गुन्हा दाखल झाला असून अशोक खरातसह समता पतसंस्थेच्या राहाता शाखेच्या व्यवस्थापकावर गुन्हा दाखल झाला. २०२१ साली समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत उघडली १०० खाती उघडून या खात्यातून आतापर्यंत ६० कोटीहून अधिक रकमेची देवाणघेवाण झाल्याची माहिती आहे.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. शिर्डी पोलीसांकडून १९ खातेदारांची चौकशी सुरू असताना हा घोटाळा समोर आला आहे. दरम्यान,



अशोक खरात प्रकरणाच्या तपासात खरातच्या अनेक मालमत्ता आणि बँक खात्यांबाबत माहिती उघड झाली.

अनेकांना जाळ्यात फसवून भोंदूबाबा अशोक खरातनं मोठी संपत्ती जमवल्याचं तपासात समोर आलं आहे. यामुळे भोंदूबाबा अशोक खरात आता ईडीच्याही निशाण्यावर येण्याची शक्यता आहे. अशोक खरात प्रकरणाचा तपास आता ईडी करणार असून यामध्ये सहभागी असलेल्या कोणालाही सोडणार नाही असा थेट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

भोंदू बाबा अशोक खरातनं केवळ अंधश्रद्धेच्या नावाखालीच नव्हे, तर 'हवाला' रॅकेटच्या माध्यमानंही फसवणूक केल्याची माहिती आता समोर आली आहे. विशेष म्हणजे, हे रॅकेट चालवण्यासाठी मुंबईतील एका आलिशान पंचतारांकित हॉटेलचा वापर केला जात होता, अशी माहिती असून अशोक खरातने मुंबईतील एका प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलमध्ये एक स्पेशल सूट कायमस्वरूपी बुक केला होता. या रूमचे दिवसाचे भाडे २५ हजार रुपये एवढे होते. वर्षभर ही रूम अशोक खरातच्या नावावर बुक असायची. याच आलिशान रूममधून कोट्यवधी रुपयांच्या हवाला व्यवहारांची देवाण-घेवाण आणि आखणी केली जात असल्याचं या तपासात समोर येत असून भोंदूबाबा अशोक खरातबाबत अनेक नवनवीन खुलासे उघड होत आहेत.

# लोणार येथे आज भव्य 'योग महोत्सव'

## प्रशासनाने यशस्वी आयोजनासाठी सज्ज राहावे केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध लोणार सरोवर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे उद्या, ७ एप्रिल रोजी भव्य 'योग महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर 'काउंटडाऊन' उपक्रमाचा भाग म्हणून साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवात सर्व शासकीय यंत्रणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

महोत्सवाच्या नियोजनासंदर्भात लोणार येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आयुष विभागाच्या सहसचिव मोनालिसा दास, मुख्य कार्यकारी





अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, मुरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान चे संचालक डॉ. काशिनाथ समघंडी, कार्यक्रम अधिकारी डॉ. ईश्वर आचार्य यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा व्यापक प्रचार-प्रसार व्हावा, या उद्देशाने आयुष मंत्रालयाच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ७ हजारांहून अधिक योगसाधक सहभागी होणार असल्याची माहिती देताना प्रतापराव जाधव यांनी योग ही भारतीय संस्कृतीतील प्राचीन परंपरा असून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचे सांगितले.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रण याबाबत सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले.

या योग महोत्सवाच्या माध्यमातून लोणार सरोवर या पर्यटन स्थळाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळण्यास मदत होणार असून, एकाच वेळी सर्वाधिक लोकांनी 'त्रिकोणासन' करण्याचा विक्रम नोंदवत एशियन बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये नोंद करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या उपक्रमात इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन, योग विद्या गुरुकुल, क्रीडा भारती, पतंजली योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हिंग, महिला बचत गट तसेच शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## वृत्तविशेष...

### डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी स्वीकारला बुलढाणा जिल्हाधिकारी पदाचा पदभार



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी आज बुलढाणा जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी म्हणून अधिकृतपणे पदभार स्वीकारला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. देवरे यांचे स्वागत करून प्रशासकीय सूत्रे त्यांच्याकडे सुपूर्द केली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी, विविध विभागांचे उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. देवरे यांनी जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून जिल्ह्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासकीय कामात गतीमानता आणण्याला आपले प्राधान्य असेल, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

### महात्मा ज्योतिबा फुले जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी; बुलढाण्यात ८ ते ११ एप्रिल कार्यक्रमांची रेलचेल



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** महात्मा ज्योतिबा फ ुले यांची जयंती बुलढाणा शहरासह राज्यभर मोठ्या उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. यावर्षी ८ ते ११ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

८ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर तसेच १८ तासांचा अभ्यास उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणही करण्यात येणार आहे. ९ एप्रिल रोजी पुणे येथील महात्मा फुले वाडा येथून बुलढाण्याकडे मशाल दिंडीचे आगमन होणार आहे.

१० एप्रिल रोजी महिला जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सावित्रीबाई फुले यांच्यासह विविध थोर महिलांची वेशभूषा परिधान करून व्याख्यान, पथनाट्य आणि विविध खेळांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. ११ एप्रिल रोजी शहरातील विविध ठिकाणी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

या संदर्भात पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे अध्यक्ष गोपाळ निळकंठ, कार्याध्यक्ष निलेश गोरे, उपाध्यक्ष शंकर राऊत, सचिव पी. एन. बोदळे, माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे यांच्यासह आशिष लहासे, वैभव इंगळे, सुरेश चौधरी, के. टी. पांडव, विशाखा गोरे, वंदना निळकंठ, रंजना पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### आयपीएल २०२६ चा आजचा सामना होणार रद्द?

**मुंबई। प्रतिनिधी :** आयपीएल २०२६ मधील १२वा सामना आज कोलकाता नाइट राइडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यात रंगणार असून, हा मुकाबला कोलकात्यातील ईडन गार्डन्स मैदानावर खेळवला जाणार आहे. या सामन्याकडे सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. एका बाजूला कोलकाता संघ पहिल्या विजयाच्या शोधात मैदानात उतरणार आहे, तर दुसऱ्या बाजूला पंजाब किंग्सची टीम सलग तिसऱ्या विजयासाठी जोर लावणार आहे. मात्र, कोलकात्याच्या हवामानामुळे चाहत्यांची चिंता वाढली आहे.

कोलकाता नाइट राइडर्स आणि पंजाब किंग्ससाठी हवामान एक आव्हान ठरू शकते. हवामान विभागाच्या मते, हवामानाचा खळ्ठ-इँखए सामन्यावर परिणाम होऊ शकतो. शहरात दिवसभर ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून, पावसाची शक्यता आहे. पावसासोबतच, सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेमुळेही सामन्यात व्यत्यय येऊ शकतो. सायंकाळी ७:०० ते ८:०० च्या दरम्यान पावसाची शक्यता ४० टक्के असून, पुढील तासात ती ५० टक्क्यांपर्यंत वाढेल आणि रात्री हळूहळू कमी होईल. अशा परिस्थितीत, सामना लवकर संपण्याची शक्यता वाढते.

# चुलीवर भाकरी; गॅस टंचाईविरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे गॅस टंचाईच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. चक्क चुलीवर भाकरी करून सरकारविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. राज्यात सध्या गॅस टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली असून, यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

घरातील शेगड्या थंड पडल्या आहेत, तर चहाच्या टपऱ्या, खाद्य स्टॉल आणि छोटे हॉटेल्स बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अनेक कुटुंबांना पुन्हा लाकूड-कोळशाच्या चुलीचा आधार घ्यावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर खामगाव येथे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी चुलीवर भाकरी करून अनोख्या पद्धतीने आंदोलन छेडले. ''नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर'' अशा घोषणाबाजी करत सरकारला जाब विचारण्यात आला.

# लघु उद्योगांना भूखंड शुल्कात २० टक्के सवलत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** आखाती देशातील युद्धामध्ये जागतिक बाजारपेठेत निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फटका राज्यातील उद्योगांना बसू नये, यासाठी म हायुती सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (एम एसएमई) बळ देण्यासाठी सामायिक सुविधा केंद्रांच्या (कॉमन फॅसिलिटी सेंटर्स) भूखंड शुल्कात तब्बल २० टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

इराण-इस्त्राईल आणि अमेरिकेतील युद्धामुळे कच्च्या मालाचा पुरवठा आणि निर्यातीवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील लघुउद्योजकांना उभारी देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) भूखंड शुल्कात मोठी कपात करण्यात आली आहे. याशिवाय, उद्योगांना आकारले जाणारे १० टक्के प्राधान्यक्रम शुल्कही आता माफ करण्यात आले असून, ही सवलत २०० चौरस मीटरपर्यंतच्या भूखंडांना लागू असेल. यामुळे लहान उद्योजकांना एकत्र येऊन स्वत:चे क्लस्टर उभारणे अधिक सुलभ होणार आहे.

यासोबतच सामायिक सुविधा केंद्रांमधील अंतर्गत डांबरी रस्ते आता एमआयडीसी स्वत: बांधून देणार आहे. विशेष म्हणजे, या रस्त्यांच्या जागेसाठी उद्योजकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. भविष्यात विकसित होणाऱ्या नवीन औद्योगिक वसाहतींमध्ये एमएसएमई क्षेत्रासाठी स्वतंत्र भूखंडांचे नियोजन करण्याचे धोरणही उद्योग विभागाने आखले आहे. यामुळे 'मोठ्या' उद्योगांच्या स्पर्धेत अडकण्याऐवजी लघुउद्योजकांना हक्काची जागा मिळणे सोपे होणार आहे.

राज्यातील लघु उद्योगांची संख्या

सूक्ष्म उद्योग : ७० लाख ३१ हजार ४८१ लघुउद्योग : ७४ हजार ४९९ मध्यम उद्योग : ६ हजार ८८९

# गोरेगावात शोभायात्रेदरम्यान दोन गट भिडले; पोलिसांचा लाठीचार्ज, ८ जणांना अटक

**मुंबई। प्रतिनिधी :** काल गोरेगाव पूर्व येथील संतोष नगर परिसरात शोभायात्रेदरम्यान दोन गटांमध्ये अचानक उसळलेल्या वादाने हिंसक रूप धारण केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून परिसरात काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, मरियम माता शोभायात्रा सुरू असताना संतोष नगर मार्केट परिसरातील ज्योती बार अँड रेस्टॉरंटजवळ किरकोळ कारणावरून दोन गटांमध्ये वाद झाला. काही क्षणातच हा वाद तीव्र होत म ारहाणीपर्यंत पोहोचला. उपस्थितांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही गटांकडून ढकलाढकली, मारहाण आणि गोंधळ उडाला.

या घटनेत काही जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जोगेश्वरी येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, दिंडोशी पोलीस ठाणे येथील पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी प्रथम जमावाला समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने हलका लाठीचार्ज करण्यात आला.

# विजयराज शिंदे हा दुसरा भोंदू बाबा खरात; आ. संजय गायकवाड यांचा आरोप चौकशीची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** बुलढाणा विधानसभा मतदारसंघात विकासकामे आणि विविध आरोपांवरून सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार वाद रंगला आहे. शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी चिखली येथे झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात भाजप कार्यकर्त्यांना सुमारे दीडशे कोटी रुपयांची विकासकामे दिल्याचा दावा केला होता. या दाव्यावर भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांनी तीव्र आक्षेप घेत, गायकवाड यांनी दिलेल्या कामांचा तपशील सादर करावा, अशी मागणी केली होती.

यावर प्रत्युत्तर देताना आमदार गायकवाड यांच्यासह तत्कालीन भाजपा नगरसेवकांनी दीडशे कोटींपेक्षाही अधिक विकासकामे झाल्याचा दावा करत विविध कामांचा पाढा वाचला. त्यामुळे हा वाद अधिकच चिघळला आहे. दरम्यान, आमदार गायकवाड यांनी विजयराज शिंदे यांच्यावर गंभीर आरोप करत त्यांची चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. शिंदे यांच्याशी संबंधित आश्रमशाळेबाबतही त्यांनी गंभीर आरोप केले असून या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, असे ते म्हणाले. या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

तसेच, भोंदूबाबा अशोक खरात



प्रकरणावरूनही वातावरण तापले असून, या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नावही चर्चेत आले आहे. या सर्व प्रकरणांची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचबरोबर, बुलढाणा नगरपालिकेतील सफाई कामगार अतिश बेंडवाल याला नोकरीवरून काढण्यासाठी कटकारस्थान होत असल्याचा आरोप मुन्ना बेंडवाल यांनी केला आहे.

मात्र, यावर प्रतिक्रिया देताना आमदार गायकवाड यांनी मुन्ना बेंडवाल यांच्यावर टीका करत, संबंधित कर्मचारी सहा महिन्यांपासून कामावर हजर नसल्याचा दावा केला. कामावर न येता पगार घेणाऱ्यांवर कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्याचा इशाराही त्यांनी दिला. या सर्व घडामोडींमुळे बुलढाण्यातील राजकीय वातावरण सध्या चांगलेच तापले असून, पुढील काळात या प्रकरणात आणखी आरोप-प्रत्यारोप होण्याची शक्यता आहे.

# मेहकरात शेतकऱ्यांचा संताप उफाळला!

## गजानन बोरकर यांचे अर्धनग्न व डफडे बजाव आंदोलन

### शेतकरी सन्मान योजनेतून वंचितांना न्याय देण्याची मागणी, कृषी विभागाविरोधात जोरदार घोषणाबाजी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यात शेतकरी सन्मान योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेल्या हलगर्जीपणाविरोधात आंदोलन सम्राट गजानन बोरकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (६ एप्रिल) कृषी कार्यालयावर अर्धनग्न व डफडे बजाव आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या शेतकरी सन्मान योजनेचा लाभ अनेक पात्र शेतकऱ्यांना मिळत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना योग्य माहिती दिली जात नसल्याने आणि कार्यालयात सन्मानाची वागणूक मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर गजानन बोरकर यांनी अंगावर बेशरम व लिंबाच्या झाडाच्या फांद्या लावून डफडे वाजवत कृषी कार्यालयावर मोर्चा काढला. ''तालुका कृषी अधिकारी निषेध असो'' अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, तालुका कृषी अधिकारी बैठकीसाठी बाहेरगावी असल्याने उपस्थित अधिकाऱ्यांनी आंदोलकांची समजूत काढली. तसेच शेतकऱ्यांना यापुढे सन्मानाची वागणूक देण्यात येईल व सन्मान योजनेपासून वंचित शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे तात्काळ लाभ देण्यात येईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनात मुरलीधर लाभाडे, अमोल बोरे, दत्ता भुतेकर, विठ्ठल भुतेकर, गोपाल ईगळे, शिवा ईगळे, गजानन कावले, मनोज नव्हाळे, राम दुगाणे, अर्जुन कुटे, श्रीराम हुले यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

